ROYAL -ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42 

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

# मराठी अनुक्रमाणिका


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५० | शारीरिक शिक्षणातील उच्च शिक्षण हि काळाची गरज<br>प्रा. विशाल प्रकाश गायकवाड | १६६-१६७ |
| ५१ | मराठी भाषेत व्यवस्था परिवर्तनासाठी निर्माण झालेल्या साहित्याची प्रेरणा आणि स्वरुप<br>कल्याण नामदेव श्रावस्ती | १६८-१७० |
| ५२ | महाराष्ट्रातील अब्राह्मणी इतिहासलेखन प्रवाह<br>प्रा. धाडगे सोमनाथ व्यंकटी | १७१-१७३ |
| ५३ | महात्मा गांधीजीच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेचे महत्व<br>प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | १७४-१७८ |
| ५४ | भारतातील शिक्षण<br>नयु धंदाडे | १७९-१८२ |
| ५५ | पाली साहित्यातील प्रतिबिंबीत होणारे मैत्री बल<br>प्रा. डॉ. केवटे अशोक आर.<br>सोलनिंदा सोमिनाथ दाभाडे | १८३-१८५ |
| ५६ | महात्मा गांधीजीचे शैक्षणिक चिंतन : एक अभ्यास<br>डॉ. भालेराव जे. के. | १८६-१८८ |
| ५७ | इतिहास लेखनातील नवीन प्रवाह - स्थानिक इतिहास लेखन<br>डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव | १८९-१९० |
| ५८ | मराठी कादंबरी आणि अस्तित्ववादी प्रवाह<br>डॉ. भाऊसाहेब दा. गव्हाणे | १९१-१९४ |
| ५९ | राज्यशास्त्रातील नवप्रवाह : डेव्हिड ईस्टन यांचे योगदान<br>डॉ. राजू भागाजी बनारसे<br>डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे | १९५-१९९ |
| ६० | पाली साहित्यातील नविन बदल/ वाढ<br>बहिरव निर्मला बाळकृष्णा | २००-२०३ |
| ६१ | पालि साहित्यातील नवीन संकल्पना<br>धनराज ना. गोंडाणे | २०४-२०६ |
| ६२ | इतिहासाच्या नवीन विचार प्रवाहातुन वंचिताचे लेखन<br>प्रा. गुंजकर सोमनाथ लक्ष्मण | २०७-२०९ |
| ६३ | क्रिडा क्षेत्रातील व्यक्ति व खेळाडूसाठी संतुलित आहाराचे उपयोजन<br>प्रा. डॉ. विठ्ठल रामकिशन भोसले | २१०-२१३ |
| ६४ | शंकर पाटील यांच्या ग्रामीण कथासंग्रहातील नारी चित्रण<br>प्रा.डॉ.विठ्ठल जंबाले | २१४-२१७ |
| ६५ | वस्तु आणि सेवाकर : लाभ व आव्हाने<br>प्रा. डॉ. अशोक टिपरसे | २१८-२२१ |




Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

आंतरराष्ट्रीय चर्चासत्र - २०१७
ROYAL-ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42

# ६४ शंकर पाटील यांच्या ग्रामीण कथासंग्रहातील नारी चित्रण

प्रा.डॉ.विठ्ठल जंबाले
प्रमुख, मराठी विभाग, देगलूर महाविदयालय,देगलूर.

१९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे लेखक आले.त्यामध्ये जयंत दळवी,द.मा.मिरासदार, गो.नी.दांडेकर,श्री.ना.पेंडसे,रणजित देसाई,रा.र.बोराडे.बाबा कदम,नागनाथ कोतापल्ले,शंकर पाटील इत्यादी. या प्रमुख लेखकांपैकी शंकर पाटील यांच्या निवडक लेखन वृत्तीचा प्रातिनिधिक रुपात अभ्यास करुन त्यांच्या लेखन कृतीतून आलेल्या ग्रामीण स्त्रीच्या विविध प्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोधालेखाचा प्रमुख उद्देश आहे.

या काळाच्या साहित्यात स्त्रीचे विविध रुपे आपणांस पाहवयास मिळतात. या काळात स्त्री शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता,त्यामुळे तिचे वेगवेगळे रुप आपणांस या काळात पाहावयास मिळत होते. त्यापैकी एक म्हणजे पारंपरिक स्त्रीचे रुप होय.समाजातील प्रथा,परंपरा,रुढी यांचा प्रभाव स्त्री मनावर पडलेला आपणांस आढळतो. संसारातील सुख दुःखात ती पतीच्या बरोबरीने सहभागी झालेली दिसते. संसारात आपल्या पतीकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता ती संसाराचा रथ ओढण्याचा प्रयन्त करते.

शंकर पाटील यांच्या लेखनात पारंपरिक स्त्रीचे चित्रण आपणांस पाहवयास मिळते. शंकर पाटील यांच्या ''वेणा'' या कथेत भागी नावाच्या स्त्रीचे दर्शन आपणांस होते. हया स्त्रीची प्रसव वेदना व प्रसुतीनंतरची अवस्था आपणांस पाहावयास मिळते.भागाचे प्रसुतीचे दिवस भरले असतांना तीचा नवरा तिला बाजार आणण्यासाठी बाजारात पाठवतो,तेव्हा तिच्या मनाची अवस्था लेखक पुढील शब्दांत व्यक्त करतात'' बायकूची माया असती तर मला लावून दिलं असतं? त्याला मायाच न्हाई. काय करायचं? इलाज नाही,ते मला जाव लागलं,उदया बाळंतपण झालं तर काय करु? घरात तेल मीठ तर नको?''[१] स्वतः अडचणीत असतांना सुध्दा संसाराची चिंता करणारी संसाराची अडचण दूर करणारी पारंपरिक स्त्रीचे चित्रण या कथेत आपणांस जाणवते.

हिंदू धर्मात पतीला परमेश्वर मानण्याची प्रथा आहे. वटसावित्रीच्या दिवशी प्रत्येक हिंदू स्त्री आपल्या पतीला दीर्घ आयुष्य लाभावे, जन्मोजन्मी हाच पती मिळो अशी प्रार्थना करते. मग पती कसा का असेना ? मग तो दारु पिणारा असो की भांडखोर असो की मारपीट करणारा असो. प्रत्येक स्त्री या पतीसाठी प्रार्थना करते. या पतीचा त्रास सहन करते.अशा स्त्रीचे रुप आपणांस या काळातील साहित्यात दृष्टिगोचर होते.नवऱ्याचा त्रास सहन करणारी पारंपरिक स्त्री आपणांस शंकर पाटील यांच्या कथेत दिसून येते. जनाईचा नवरा शेतात ठाण मांडून बसलेला आहे त्याची भाकरी घेऊन जनाई शेतात जाते. जनाईचा नवरा तिला मारतो. तेव्हा जनाई तिच्या नवऱ्याला उद्देशून म्हणते,'जीव घेवून मोकळा हो. मारुन टाक. तुझ्या अगुदर मरानं आलं तर सोनं होईल माझं! काय वाईट होईल? त्याचं भ्या वाटत न्हाई बाबा मला. तस असते तर हितं कशाला आलू असतो.''[२] अशा प्रकारे आपणांस पारंपरिक स्त्रीचे चित्रण या उदाहरणाव्दारे होते.

शंकर पाटील यांच्या लेखनात आपणांस स्त्रीचे दुसरे रुप म्हणजे मातेचे रुप पाहावयास मिळते. स्त्रीच्या आयुष्यात सगळयात मोठा आनंद देणारा क्षण जो असतो तो म्हणजे आई होणं.शंकर पाटील यांच्या लेखनात आपणांस प्रेमळ स्वरुपाची माता, हळव्या स्वभावाची माता,अंधश्रध्देतून निष्ठूर झालेली माता अशा वेगवेगळया रुपात स्त्रीचे दर्शन आपणांस होते.

आपल्या अपत्या बद्दलची अस्वस्थता या ठिकाणी व्यक्त करतांना ' चिंधी' या कथेत लेखक व्यक्त करतात-'' का पडलीस म्हणून तरी कसं विचारायचं? तिने बोलणंच टाकल होत.पोटाला येऊन तिनं आई बरोबर दावा धरला होता.''[३] आज पण आपण असे उदाहरण पाहतो कि आई व मुलीचे बोलणं बंद झालेले आहेत,त्याची विविध कारणे आहेत,तरी पण आई या नात्याने तिच्या मनात आपल्या अपत्याबद्दल काळजी असतेच. आपल्या मुली विषयीची अस्वस्थता तीला बेचैन करते.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist Nanded मराठी

ग्रामीण भागात आई मजुरीला जाते. घरचे सर्व काम घरातील मुली करतात.कारण शेतात राबून आल्यानंतर त्या स्त्रीच्या शरीरात त्राण राहिलेला नसतो. म्हणून एक ग्रामीण स्त्री आपल्या मुलीकडून एवढी अपेक्षा ठेवते की संध्याकाळी चूलीची व्यवस्था मुलीने करावी. हा विचार स्त्रीच्या दृष्टिने वाजवी आहे. शंकर पाटील आपल्या कथेत चंद्राच्या माध्यमातून आईची ही अपेक्षा व्यक्त करतांना स्त्रीच्या मनातील विचार व्यक्त करतात,'' एवढं तिनं करुन ठेवले असते, तर मनाला किती आनंद वाटला असता! आल्याबरोबर भूकेच्या पोटी एक भाकरी खाऊन गप पडलो नसतो?''[४]

१९६० च्या काळात समाजात निरक्षरतेचे प्रमाण जास्त होते. या काळात स्त्री शिक्षणाचा प्रसार न झाल्यामुळे स्त्रिया अंधश्रध्दाळू होत्या.समाजात पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया जास्त प्रमाणात अंधश्रध्दावर विश्वास ठेवणाऱ्या असतात. कारण कोणाच्याही भूलथापावर त्या विश्वास ठेवतात.समोरच्या व्यक्तीचा विचार न करता विश्वास ठेवणारी स्त्री आपणांस या काळात दिसून येते.समाजात मुलीला जन्म देणारी आई श्रेष्ठ मानली जात नाही कारण कुटुंबाचा वंश चालवायला मुलगा लागतो. यासाठी मुलाला जेवढे महत्त्व कुटुंबात असते तेवढे महत्त्व मुलीला नसते. याबाबत समाजात वेगवेगळे गैरसमज आपणांस पाहावयास मिळतात. कोणाच्या जन्मामुळे किंवा पायगुणामुळे आपत्ती येते.असा गैरसमज समाजात अजूनही पाहावयास मिळतो.

'आतडं' या कथेत याच अंधश्रध्देची प्रचिती येते. 'हिरा' नावाची पत्नी आपला पती 'तुकाराम' आजारी पडला,त्याच्या आजाराचं कारण जन्माला आलेली मुलगीच आहे ,असे ती मानते. तुकारामाचा ताप उतरत नसतो तेव्हा हिरा त्या नवजात मुलीला उद्देशून म्हणते,'' लौकर बरं वाटलं तर तुला पाजीन न्हाई ,तर तश्शी उपाशी मारीन.''[५]

आईची माया ही न मोजता येणारी आहे. मनुष्य असो वा प्राणी असो या दोघांचेही मातृप्रेम सारखेच असते. एक मांजर किंवा कुत्री जेव्हा बाळंत होतात किंवा व्यातात.आपल्या पिल्लांसोबत राहताना तेव्हा मनुष्याचा स्पर्श ही पिल्लांना होऊ देत नाहीत, मग त्यांना कितीही त्रास झाला , तरी त्या सहन करण्यास तयार असतात. हे तर प्राण्यां बद्दलचं झालं तसेच प्रेम एक आई आपल्या मुलांवर करते. मग त्या पुत्रप्रेमासाठी आपला जीव देण्यास ही नेहमी ती तत्पर असते.मुलाचा विरह सहन न करणाऱ्या आईचे वर्णन शंकर पाटील यांनी 'पान्हा' या कथेत केलेले आहे. रत्ना नावाची एक स्त्री आहे.तिचा नवरा व सासू हिला नेहमी मारहाण करतात व अत्याचार करतात.अशा स्थितीत रत्नाला एक रत्न होतो.नेहमीच्या अत्याचाराला कंटाळून रत्ना ही माहेरी निघून जाते.माहेरी गेल्यानंतर रत्नाची सासू मुलाला पळवून आणते. रत्नाची सासू रत्नाला घरी घेत नाही व त्या मुलालाही देत नाही. अशी अवस्था असतांना रत्ना आपल्या वडिलांकडे सासरी जाण्याचा आग्रह करते. तेव्हा ती आपल्या वडिलांना म्हणते,''मला उभी चिरली तर चिरु द्या . पर मला घालवून या चला. एकदा डोळयांनी मला पोराला बगू द्या. माझी खांडोळी करायची असली तर ते करू देतं. पर मला घेऊन चला.''[६]अशा प्रकारे आपणांस मुलाचा विरह सहन न करणारी आई,पुत्र प्रेमासाठी मृत्यूला जवळ करणारी आई शंकर पाटील याच्या कथेत दिसून येते.

रत्नाच्या मुलाला रत्नाची सासू आपल्या अंगावरचे दूध पाजते. या ठिकाणी लेखक शंकर पाटील सांगण्याचा प्रयत्न करतात की, आई होण्यासाठी मनाचा पाझर फुटणे आवश्यक असते. मग तेथे वयाची अट नसते. असाच आशय पुढील उदाहरणाव्दारे मिळतो. रत्नाची सासू मुलाला दूध पाजातांना म्हणते,''बघ हे दूध येतंय का न्हाई! एक बारीक पिचकारी उडावी तशी दूधाची धार झेप घेउन पूढ येत होती.''[७] प्रत्यक्ष मुलाला जन्म न देता ही प्रेमापोटी मायेचा पाझर फोडण्याचे मनोधैर्य या स्त्री मध्ये आपणांस दिसून येते.

या कथेची चिकित्सा करतांना नागनाथ कोतापल्ले लिहतात,''पान्हा मधील सासूचे वय किती ते शंकर पाटील सांगत नाहीत. या कथेतील सासू आपल्या स्तनातले दूध नातवाला पाजते अशी घटना येते. पण जुन्या काळात आणि आजही ग्रामीण भागात सासू –सुना एकत्र बाळंत होत असत, हे समाज वास्तव एकदा लक्षात घेतले की 'म्हाताऱ्या सासूच्या दुग्धधारा खोटया आणि हास्यास्पद ठरत नाहीत.''[८]

१९६० नंतरच्या कालखंडात ग्रामीण साहित्यात शंकर पाटील यांच्या लेखनातून स्त्रीचे भोगदासी रुप आले आहे. समाजाचा स्त्री कडे पाहण्याचा भोगदासी दृष्टिकोन स्त्रीची व्याभिचार करण्याची विविध कारणे यांचे चित्रण झाले आहे.पुरुषांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन

हा उपभोग्य वस्तू एवढाचं आहे.त्याच्यापलीकडे आपण त्यांना स्थान देत नाही. चूल आणि मूल एवढंच कार्यक्षेत्र त्यांचे मानले जाते. शंकर पाटील यांच्या ' वेड ' या कथेमध्ये पुरुषांचा स्त्री कडे पाहण्याचा भोगदासी दृष्टिकोन आपणांस पाहावयास मिळतो.या कथेतील एक उदाहरणावरुन आपणांस हे स्पष्ट करता येईल नामा शामूला एका वेश्येबद्दल सांगतो -''शामराव माल बगून खुळं होशील! गव, बगितल्यावर माणूस पागळाय पायजे.''[९] या उदाहरणावरुन आपण निश्चित सांगू शकतो कि, मनुष्य हा आपली शारीरिक भूक भागवण्यासाठीच स्त्रीचा उपयोग करतो.

शंकर पाटील यांच्या 'खुषखरेदी ' या कथेतही आपल्याला याची प्रचेती येते. या कथेत चंद्राचा वापर केवळ हॉटेलचा व्यवसाय वाढवण्याच्या उद्देश्याने केलेला आहे. या कथेत बाबू शेलार नावाचा हॉटेल मालक चंद्राला घेऊन जातो. बाबू शेलारच्या हॉटेल व्यवसायात वाढ होते. पण शेलार दुसराही व्यवसाय करण्यासाठी तवनाप्पाकडून पैसे उधारीवर घेतो. पण काही कारणांमुळे तवनाप्पाचे पैसे फिटत नाहीत.त्यामुळे तवनाप्पा शेलारच्या हॉटेलवर ताबा घेतो. तवनाप्पाची नजर चंद्रावर राहते. चंद्रा दोघांकडेही न जाता सरपंचाकडे जाते. शेवटी सरपंच हॉटेलचा व चंद्राचा मालक होतो. लेखक शंकर पाटील लिहतात,''बाई गल्यावर बसू लागली.सारखा हातात पैसा खुळखुळू लागला.गिऱ्हाईक वाढलं.''[१०]

शंकर पाटील यांच्या 'धुळाक्षरे' या कथा संग्रहातील 'रामाच्या पाऱ्यामंदी' या कथेतही स्त्रीच्या व्यभिचारी रुपाचे वर्णन आपणांस दिसून येते. या कथेत हिरा नावाची स्त्री तिच्या लग्नानंतर आपल्या बाळू नावांच्या प्रियकरा सोबत मुंबईला पळून जाते व आपला नवीन संसार करु लागते. याबद्दल लेखक लिहतात,'' रामाच्या पाऱ्यामंदी दोघंही घरातून बाहेर पडले. हल्ली मुंबईला एका चाळीमध्ये त्या दोघांनी आपला संसार थाटला आहे. हातावरची पोटं त्यांची, पण त्या दोन जिवाचं जीवन म्हणजे स्वर्ग आहे.''[११]

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. या म्हणीप्रमाणे समाज बदलतो. समाजाबरोबर समाजातील लोक बदलतात. १९६० च्या काळातील स्त्री पण बदलली, जी स्त्री चूल आणि मूल सांभाळत होती ती स्त्री आता अर्थार्जन करु लागली. शंकर पाटील यांच्या लेखनातून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीचे चित्र रेखाटले गेले आहे.

'चिंधी' या कथेत चंद्रा ही अर्थार्जन करणारी स्त्री आहे. चंद्राचा नवरा दारुडया असतो. याने अनेक कर्ज घेतलेले असते. या कर्जामुळे ती वैतागली होती. ती वैतागून नवऱ्याला म्हणते,''बायकू रोजानं कामाला जाती,याची लाज न्हाई वाटत?''[१२] शेतमजूरी करुन उदरनिर्वाह करणारी स्त्री आपणांस दिसून येते.असेच आणखी एक उदाहरण आपणांस 'भूजंग' या कथेत पाहावयास मिळते. जनाई ही शेतात काम करुन घर चालवते. लेखक लिहतात,'' नवरा एक खुळा गाढ पडलेला बिन कामाचा ,कच्ची बच्ची चारा पोरांचा सांभाळ करावा,रानात राबावं,शेत पिकवावीत,का आता ही काळजी करावी ?''[१३]

शंकर पाटील यांच्या लेखनातून स्त्रीचे बंडखोर व आक्रमक रुप आले आहे. शंकर पाटील यांच्या लेखनातील स्त्री स्वतःचे पावित्र्य सांभाळताना बंडखोर बनलेली दिसून येते. एखादी स्त्री समाज रुढी विरुध्द जाऊन बंडखोर बनते. शंकर पाटील यांची कथा 'चिंधी' त चंद्रा ही आक्रमक व बंडखोर स्त्री पात्र आहे. चंद्राच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे.त्यांना शरीरावर घालण्यासाठी कपडे सुध्दा नाहीत. चंद्राचा नवरा रिकाम टेकडा आहे तो स्वतः काहीही करत नाही, उलट दारुसाठी कर्ज घेतो. या कर्जबाजाराला कंटाळून चंद्रा बंडखोर बनते व आपल्या नवऱ्याला म्हणते,'' घसासा राबायला काय धाड झाली? कशाची लाज वाटती र बाबा तुला? बायकू रोजानं कामाला जाती, त्याची लाज न्हाई वाटत?''[१४]

श्री गणेशा या कथासंग्रहातील 'किटाळ' या कथेत स्त्रीचे बंडखोर रुप आपणांस पाहावयास मिळते. या कथेत परटाच्या तरुण गंगीची मैत्री गावातील धुळा पहिलवानाशी होते. धुळाचा बाप चार चौघात गंगीचा पाणउतारा करतो. हा अपमान गंगीला सहन होत नाही.तेव्हा ती म्हणते,'' तोंडात किडं पडतील तुमच्या ! इचारा पोरालाचं. अस बोलत तीच धुळाकडं वळून म्हणाली ' का रं बाबा, मी खरी का तुझा बा खरा ?''[१५] या कथासंग्रहातील 'वेड' या कथेत शामू चंपीची वाट आडवतो, तेव्हा चंपी आपले पावीत्र्य सांभाळण्याच्या उद्देश्याने शामूला



VYAPARI EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE, DEGLOOR

ROYAL-ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42

म्हणते,'' का रं गुरवा ! आई-भणी न्हाईत जणू तुला ? खाऊन –खाऊन मस्ती आली व्हयरं? पर बगितलीस का माझ्या पायांतली चपली आदी.''[१६]

१९६० नंतरच्या कालखंडातील स्त्रियांच्या विविध प्रवृतीचा शोध घेतल्यानंतर शंकर पाटील यांच्या वरील कथासंग्रातील लेखनावरुन आपणांस खालील निष्कर्ष मिळतात.

१) शंकर पाटील यांच्या कथेतील जनाई हे पात्र पारंपरिक स्त्रीचे रुप साकार करते.

२) शंकर पाटील यांच्या लेखनातून स्त्रीच्या मातृत्वाचे वेगवेगळे रुप आपणांस आढळतात.

३) शंकर पाटील यांच्या कथेतून स्त्रीच्या भोगदासी रुपाचे दर्शन घडते.

४) प्रामुख्याने यांची जनाई ,चंद्रा ही पात्रे अर्थार्जन करणाऱ्या स्त्री रुपात साकारली आहेत.

५) शंकर पाटील यांचे हिरा हे पात्र स्त्रीच्या अंधश्रध्दाळू वृत्तीच्या रुपात साकारली आहे.

६) शंकर पाटील यांची चंद्रा ,गंगी हया पात्रातून स्त्रीच्या बंडखोर रुपाचे दर्शन प्रत्ययास येते.

**संदर्भ**

१) ऊन –शंकर पाटील इंद्रायणी प्रकाशन,पुणे .प्र.आ.१९९४ पृ.क्र.०३

२) कित्ता पृ.क्र.३५

३) कित्ता पृ.क्र.१५

४) कित्ता पृ.क्र.१५

५) कित्ता पृ.क्र.४९

६) कित्ता पृ.क्र.९३

७) कित्ता पृ.क्र.९३

८) नवकथाकार शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास '' डॉ.नागनाथ कोतापल्ले, इंद्रायणी प्रकाशन पुणे प्र.आ.१९८६ पृ.क्र.४५

९) श्री गणेशा-शंकर पाटील पृ.क्र.३५

१०) कित्ता पृ.क्र.१५३

११) धुळाक्षरे –शंकर पाटील इंद्रायणी प्रकाशन पृ.क्र.३८

१२) ऊन –शंकर पाटील इंद्रायणी प्रकाशन प्र.आ.१९९४ पृ.क्र. २४

१३) धुळाक्षरे –शंकर पाटील इंद्रायणी प्रकाशन पृ.क्र.१०२

१४) ऊन –शंकर पाटील इंद्रायणी प्रकाशन प्र.आ.१९९४ पृ.क्र. १८

१५) श्री गणेशा-शंकर पाटील पृ.क्र.१३

१६) कित्ता - पृ.क्र.३२

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded